11 AUG 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'केशवराव' अध्यासनासाठी हवेत २ कोटी

## शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेच्या अध्यक्षांना पत्र



■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : कमीत कमीत दोन कोटी रुपये इतकी रक्कम ठेव म्हणून निधी स्वरूपात जमा केल्यानंतरच शिवाजी विद्यापीठात 'संगीतसूर्य केशवराव भोसले' अध्यासन कार्यान्वित करण्याची कार्यवाही होणार आहे. त्याबाबतचे पत्र विद्यापीठ प्रशासनाने या अध्यासन उभारणीची मागणी करणाऱ्या डॉ. सतीश पावडे यांना पाठविले.

वर्धा येथील डॉ. पावडे हे संगीतसूर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांनी आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार असणाऱ्या संगीतसूर्य भोसले यांच्या संगीत, रंगभूमी क्षेत्रातील कामगिरीची नव्या पिढीला ओळख व्हावी. त्यांचे कार्य समाजासमोर विविध माध्यमांतून पोहोचावे, या उद्देशाने विद्यापीठामध्ये 'संगीतसूर्य केशवराव भोसले' या नावाने नवीन अध्यासन सुरू करावे, अशी मागणी केली. त्याबाबतचे पत्र त्यांनी विद्यापीठाला दोन वर्षांपूर्वी पाठविले होते. त्यावर विद्यापीठ प्रशासनाने त्यांना गेल्या दीड महिन्यांपूर्वी पत्र पाठविले आहे. त्यात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठामध्ये नवीन अध्यासन सुरू करण्यासाठी कमीत कमी रक्कम दोन कोटी रुपयांची ठेव निधी स्वरूपात आवश्यक आहे. त्यामुळे तितकी रक्कम ठेव म्हणून निधी स्वरूपात जमा झाल्यानंतर अध्यासन कार्यान्वित करण्यात येईल, असे कळविले आहे.

### अध्यासनासाठी कोल्हापूरकरांनी एकत्र यावे

■ 'आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार असलेल्या संगीतसूर्य भोसले यांनी ३१ वर्षांत इतके भलेमोठे काम केले आहे की, त्यांचे अध्यासन कोल्हापुरातील विद्यापीठात व्हावे इतकाच माझा उद्देश होता. त्यावर विद्यापीठाने मला पाठविलेले पत्र मी कोल्हापुरातील संगीत, नाट्य क्षेत्रांतील माझ्या परिचितांना, सहकाऱ्यांना 'शेअर' केले आहे. कोल्हापूरकरांनी या अध्यासनासाठी एकत्र यावे, अशी अपेक्षा डॉ. पावडे यांनी व्यक्त केली आहे. निधी उभारणीबाबत कोल्हापूरकर, शासनाने मदतीचा हात द्यावा. अध्यासनाकरिता लागणारे वाचन, अध्यापनाचे साहित्य देण्याची जबाबदारी आम्ही घेतो, असेही त्यांनी सांगितले आहे.



"संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे विद्यापीठातील अध्यासनाच्या माध्यमातून होणारे काम पिढ्यांन्‌पिढ्या राहील. नव्या पिढीला ते प्रेरणादायी ठरेल, या उद्देशाने विद्यापीठाला अध्यासन निर्मितीबाबतचे पत्र पाठविले आहे. मात्र, विद्यापीठाने निधीबाबतच्या अधिकार मंडळाच्या निर्णयाची माहिती दिली आहे.

\- डॉ. सतीश पावडे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2025
पुढारी

# केशवराव भोसले अध्यासन प्रक्रिया निधी जमा केल्यानंतरच



## शिवाजी विद्यापीठातर्फे केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेला पत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात संगीतसूर्य केशवराव भोसले अध्यासन सुरू करायचे असेल, तर त्यापूर्वी किमान दोन कोटी रुपयांची ठेव निधी स्वरूपात जमा करावी लागेल, असे पत्र शिवाजी विद्यापीठाच्या वतीने केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेला पाठवण्यात आले आहे.

संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या कार्याचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात अध्यासन सुरू करावे, अशी विनंती केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सतीश पावडे यांनी २६ डिसेंबर २०२३ रोजी पत्राद्वारे केली होती. या पत्राच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातर्फे कळवण्यात आले आहे.


प्रस्तावित केलेल्या अध्यासनासाठी किमान २ कोटी रुपये निधी स्वरूपात जमा झाल्यानंतरच अध्यासन कार्यान्वित करण्याची कार्यवाही होईल, असे शिवाजी विद्यापीठाच्या पत्रात नमूद केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2025

लोकमत

# राजवर्धन पाटील याला विद्यापीठाचा कलर्स अवॉर्ड

प्रयाग चिखली : निटवडे (ता. करवीर)



येथील राजवर्धन सुरेश पाटील यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कलर्स अवॉर्ड देऊन गौरवण्यात आले. मल्लखांब खेळामध्ये ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्तरावर सांघिक सुवर्णपदक पटकावले. त्याचबरोबर खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स या स्पर्धेत सहभाग नोंदवला. यापूर्वीही राजवर्धने मल्लखांबमध्ये राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवले आहेत. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. एस. व्ही. बनसोडे, इतर पदाधिकारी उपस्थित होते. राजवर्धन पाटील याला क्रीडा शिक्षक तुषार पवार, विशाल पाटील, विश्वास चोपडे, केआयटी कॉलेजचे क्रीडा प्रमुख विजय रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2025
पुढारी

# पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुसार विद्यार्थांना २५ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहे.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेचे परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार पीएच.डी.साठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. याकरिता www. unishivaji. ac. in अंतर्गत ph. d Admission २०२५-२६ या विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी. प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक आणि हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाणार आहे.